**परदेश गमनार्थ रजा मंजूर करण्याबाबत**
**मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**परिपत्रक क्र.प्राधि/परदेश गमनार्थ रजा /२०१८/ 1077/प्र-११**
**दिनांक** 7 APR 2018

---

**संदर्भ**-१) प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.एमएच/एमएससी/११८५/१४००३/प्र.१४ दि.०५/०९/१९८५
२) शासन परिपत्रक क्र.भाप्रसे/१०१५/प्र.क्र.२१२/२०१५/९ दि.२९/०८/२०१५
३) शासन परिपत्रक क्र.प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ/ दि.०९/०३/२०१५

---

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, यांनी संदर्भ क्र. २ अन्वये पारपत्र प्राप्त करण्यासाठी अवलंबवयाच्या कार्यपध्दती बाबत शासन निर्णय निर्गमित केलेला असल्यामुळे प्राधिकरणाने संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित केलेले परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील विभागीय मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना **परदेश गमनार्थ रजा (भारताबाहेरील)** मंजूर करण्याकरीता सुत्रतेसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) परदेश गमनाकरीता रजा मंजूर करण्याचे सर्व अधिकार म्हाडा अधिकार प्रदानतेनुसार मा.उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्याकडे राहतील.

२) अधिकारी/कर्मचा-यांनी परदेश गमनार्थ रजा मंजूर करण्यासाठी केलेल्या अर्जामध्ये ते कोणकोणत्या देशांना भेटी देऊ इच्छितात व साधारणत: कोणत्या कालावधीमध्ये अशी भेट देणार आहे, तसेच परेदशात जाण्याचा त्याचा उददेश, वास्तव्याचा कालावधी, त्यांच्या परदेशातील वास्तव्याचा व जाण्यायेण्याच्या खर्चाची तरतूद कशाप्रकारे करण्यात येणार आहे,**याबाबतची वैयक्तिक माहिती विवरणतक्त्यात सादर करणे आवश्यक आहे.**

३) अर्जदार अधिकारी/कर्मचा-याविरुध्द खातेनिहाय चौकशी किंवा शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित अथवा प्रलंबित आहे किंवा नाही, तसेच मा. लोकआयुक्त वा उप लोकायुक्त यांचेकडे त्यांचेविरुध्द चौकशी प्रलंबित नाही याची खात्री करुन घेण्यात यावी. तसेच विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांचेकडून असा अर्ज शिफारस केला जाईल, त्यांने याबाबत स्पष्ट अभिप्राय देणे आवश्यक आहे.

४) ज्या अधिकारी/कर्मचा-याविरुध्द खातेनिहाय चौकशी किंवा शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित असेल किंवा प्रस्तावित असेल किंवा ज्याचेविरुध्द लोक आयुक्त वा उपलोक आयुक्त यांचेपुढे चौकशी प्रलंबित असेल अशा कर्मचा-यांना परदेश गमनार्थ रजा मंजूरीसाठी '' ना हरकत प्रमाणपत्र '' देण्यात येऊ नये.

५) ज्या अधिकारी/कर्मचा-यांने परदेश गमनाकरीता घेतलेली रजा मंजूर करण्याबाबत नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुखांनी स्पष्ट अभिप्राय नोंदवावेत.

६) सदरहू परदेश गमनाकरीता घेतलेली रजा संपल्यानंतर सेवेमध्ये रुजू होऊन किमान ३० दिवस सेवा करणे अधिकारी/कर्मचा-यावर बंधनकारक राहील. सदर आदेशाचे पालन न केल्यास किंवा अधिकारी/कर्मचा-यांने रजेवर असताना राजीनामा दिल्यास, त्या कर्मचा-याची सेवा रजेवर गेलेल्या दिनांकापासून संपुष्टात आणण्यात येईल आणि रजेच्या कालावधीकरीता त्यांना देण्यात आलेला पगार एक महिन्याच्या नोटिशीच्या वेतनासह देय असलेल्या अन्य रकमेमधून वसूली केली जाईल. अशा प्रकारचे **स्वयंघोषणापत्र, प्रपत्र '' अ " प्रमाणे** संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना घोषित करुन दयावे लागेल.

शासनाच्या दि.०९/०३/२०१५ च्या निर्णयामधील शपथपत्रा ऐवजी आता स्वयंघोषणापत्र घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना परदेश गमनार्थ रजा मंजूर करण्यासाठी वरील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. सदरहु सुधारित परिपत्रक सर्व विभागप्रमुख/नियंत्रण अधिका-यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे. सदर परिपत्रकातील सूचनाची अंमलबजावणी करुन दिलेल्या निर्देशाचे/सूचनांचे उल्लंघन करणार नाहीत याची काळजी घेण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावे.

**( डॉ. बी. एन. बास्टेवाड )**
**सचिव/प्राधिकरण**

<u>**प्रत सस्नेह अग्रेषित**</u>

१) मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं इ दु व पू मंडळ,
३) मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.
४) विधी सल्लागार/प्रा.
५) वित्त नियंत्रक /प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८) मुख्य अधिकारी, मुं. झो. सु. मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/औरंगाबाद मंडळ/अमरावती मंडळ,
९) उपमुख्य अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक कक्ष /प्रा.
१०) चौकशी अधिकारी /प्रा.
११) सक्षम प्राधिकरण-१/२
१२) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा.
१३) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

<u>**प्रत माहितीसाठी**</u>

**प्रत,** मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
**प्रत,** अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
**प्रत,** प्रधान कार्यवाह, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटना
**प्रत,** अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
**प्रत,** प्रशासन-१४/प्रा.
**प्रत** लेखापाल / प्रा.
**प्रत** व.ले.प./ प्रा.

# प्रपत्र -अ

## स्वयंघोषणापत्र

मी, श्री./श्रीम---------------------------------श्री-------------------------- यांचा मुलगा/मुलगी वय ------- वर्ष, आधार कार्ड क्रमांक------------------------ व्यवसाय--------सध्या राहणार-----------------------------असे घोषित करतो की मी, परदेश गमनाकरीता घेतलेली रजा संपल्यानंतर सेवेमध्ये रुजू होऊन किमान ३० दिवस सेवा करणे मला कर्मचारी या नात्याने बंधनकारक राहील. तसे न केल्यास किंवा रजेवर असताना मी राजीनामा दिल्यास, रजेवर गेलेल्या दिनांकापासून माझी सेवा संपुष्टात आणण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणास राहील. तसेच रजेच्या कालावधीकरीता मला देण्यात आलेला पगार एक महिन्याच्या नोटिशीच्या वेतनासह मला देय असलेल्या अन्य रकमेमधून वसूल केला जाईल. याची मला जाणीव आहे.

याद्वारे असे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी व बिनचूक आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:---------

अर्जदाराची सही:--------------

दिनांक :---------

अर्जदाराचे नाव:---------------

## Annexure-A

## Self-Declaration

I, Mr./Mrs.-----------------------------------Son/Daughter of shri ------------------------------ Age--------years, Aadhar card number--------------Occuption---------------- Currently residing at---------------------do hereby declare that as employee it will be by rule obligatory for me to rejoin my duty and render my services for minimum of 30 days after completion of my leave for foreign trip. I am aware that If I fail to do so or if I resign in the mentioned leave period, this office has every right to terminate my services and the salary for the above said leave period will be recovered from the other dues payable to me with one month notice period.

I further declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Penal code and / or any other law applicable thereto.

Place---------------- Applicant's Signature-----------------

Date----------------- Applicants' Name---------------------